| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ६३ वा | शुक्रवार, दिनांक २२ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर


पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## रस्त्यावरील CCTV चे कनेक्शन पाकिस्तानात!

### लष्कराच्या हालचालींचे अपडेट सीमेपलिकडे पोहोचताच खळबळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : जम्मू काश्मीरच्या पुलवामा इथं वर्षभरापूर्वी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मुख्य सूत्रधार हमजा नुकताच पाकव्याप्त काश्मीरमध्ये मारला गेला. हे वृत्त आणि त्याच्या चर्चा थांबत नाहीत, तोच आणखी एक बातमी आली. मात्र या बातमीनं सीमाभागातील संरक्षणावर पुन्हा एकदा अनेक प्रश्न उपस्थित केले. जिथं पाकिस्तानच्या खुरापतींनी भारतात घुसखोरीचा प्रयत्न करत लष्कराची संवेदशील माहिती मिळवली असल्याचं बिंग फुटलं. गाझियाबाद, फरिदाबादनंतर आता पंजाबमधील पठाणकोट इथंसुद्धा CCTV कनेक्शनबाबत खळबळजनक उलगडा झाला आहे.**







सीसीटीव्हीच्या माध्यमातून पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या एका व्यक्तीला नुकतीच पंजाब पोलिसांनी अटक केली. भारतीय लष्करासह निमलष्करी दलाच्या प्रत्येक हालचाली आणि तत्सम माहिती तो पाकिस्तानपर्यंत पोहोचवत होता. सैन्यदलाच्या ताफ्यावर लक्ष ठेवणं, त्याबाबतची माहिती पाकिस्तानपर्यंत पोहोचवणं यासाठी त्याने सीसीटीव्ही कॅमेरांची मदत घेतली होती.

**कुठे करण्यात आली ही धडक कारवाई?**

पठाणकोटमधील एसएसपी दलजिंदर सिंह ढिल्लों यांनी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार अटकेच असणाऱ्या आरोपीचं नाव बलजीत सिंग उर्फ बिट्टू आहे. ढालीवाल गावसा मूळ रहिवासी असणाऱ्या बिट्टूने सुजानपूरपाशी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर सीसीटीव्ही लावले होते. ज्या माध्यमातून तो सैन्यदलाच्या हालचालींवर लक्ष ठेवत ही माहिती सीमेपलिकडे पाठवत होता. इतकंच नव्हे तर परदेशांमध्ये असणाऱ्या अनेक कट्टरकतावाद्यांपाशीसुद्धा ही माहिती पुरवण्यात आल्याचा आरोप आहे.

तपासातून समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार पठाणकोट पोलिसांच्या सीआयए पथकानं तपासादरम्यान या जाळ्याचा पर्दाफाश केला. ज्यामध्ये बलजीत सिंग नामक आरोपीने सुजानपूरपाशी पुल क्रमांक ४ आणि ५ दरम्यान दुकानांवर हे सीसीटीव्ही लावले होते, जे महामार्गावरील दृश्य टीपतील. लष्कर आणि निमलष्करी दलांच्या ताफ्यांचा प्रवास, ये-जा आणि त्यांच्या इतर हालचालींवर या माध्यमातून पाकिस्तान लक्ष ठेवून होतं. ज्याचं थेट प्रक्षेपण शेजारी राष्ट्रापर्यंत पोहोचत हों. बलजीतशिवाय या प्रकरणात इतर तीन आरोपींची नावं समोर आली आहेत. ही नावं खालीलप्रमाणे... १.विक्रमजीत सिंह उर्फ विक्का (नवा पिंड, सुजानपुर)२.बलविंदर सिंह उर्फ विक्की३.तरणप्रीत सिंह उर्फ टन्नू.

देशाच्या सीमाभागात पाकिस्तानकडून सुरु असणाऱ्या खुरापती अद्यापही थांबल्या नसून, अतिशय संवेदनशील हालचालींवर पलिकडून वक्रदृष्टी असल्याचं लक्षात येताच संरक्षण यंत्रणांनाही हादरा बसला आहे. त्यामुळं आता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून केंद्रीय संरक्षण मंत्रालय आणि यंत्रणा यावर कोणती पावलं उचलतात हे पाहणं महत्त्वाचं असेल.

## महिलांवर वाघाचा जीवघेणा हल्ला

### चंद्रपुरात तेंदुपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या ४ महिला जागीच ठार




**चंद्रपूर:/वृत्तसंस्था :** सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही परिसरात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या महिलांवर वाघाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. या भीषण हल्ल्यात चार महिलांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून गावात तणावाची स्थिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उन्हाळ्याच्या हंगामात तेंदूपत्ता संकलनाला सुरुवात झाल्याने ग्रामीण भागातील महिला व पुरुष मोठ्या प्रमाणावर जंगलात जात आहेत. शुक्रवारी, २२ मे रोजी पहाटेच्या सुमारास गुंजेवाही गावातील काही महिला तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेल्या होत्या. सकाळी सुमारे आठ वाजताच्या दरम्यान जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला चढविला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, महिलांना कोणतीही संधी न देता वाघाने सलग हल्ले केले. या हल्ल्यात चारही महिलांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जंगल परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

घटनेची माहिती मिळताच सिंदेवाही वनपरिक्षेत्र अधिकारी अंजली सायंकर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच पोलिस पथकाने परिसराची पाहणी करून पंचनामा सुरू केला. वाघाच्या हल्ल्यात मृत पावलेल्या चार महिलांची नावे पुढील प्रमाणे आहेत. कवडूबाई दादाजी मोहुर्ले (४५), अनुबाई दादाजी मोहुर्ले (४६), संगीता संतोष चौधरी (३६) व सुनीता कौशिक मोहुर्ले (३३).


दरम्यान, एकाच वेळी चार महिलांचा बळी गेल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. वन विभागाने नागरिकांना जंगल परिसरात सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले असून संबंधित भागात गस्त वाढविण्यात आली आहे. या घटनेमुळे सिंदेवाही तालुक्यासह संपूर्ण परिसर हादरला असून तेंदूपत्ता हंगामादरम्यान जंगलात जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** निवडणूक आयोगाने १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून आहे. या जागांवरील विद्यमान सदस्य २१ जून ते १९ जुलै दरम्यान निवृत्त होत आहेत.निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्यासह २४ खासदारांचा समावेश आहे.

**तीन राज्यातून १२ जागांवर निवडणूक**

आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांमध्ये प्रत्येकी चार जागांसाठी निवडणूक



होणार आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होईल. झारखंडमध्येही तीन जागांसाठी निवडणुका होणार आहेत. तसेच मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराम या राज्यांमध्ये प्रत्येकी एका राज्यसभा जागेसाठी मतदान होईल.

**राज्यसभा निवडणुका अशा प्रकारे होतात**

राज्यसभा खासदारांची निवडणूक प्रक्रिया इतर निवडणुकांपेक्षा खूप वेगळी असते. राज्यसभा सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले जातात, म्हणजेच ते जनतेद्वारे नव्हे, तर आमदारांद्वारे निवडले जातात. राज्यसभा हे एक स्थायी सभागृह असल्यामुळे आणि दर दोन वर्षांनी एक-तृतीयांश सदस्य निवृत्त होत असल्यामुळे निवडणुका दर दोन वर्षांनी होतात. राज्यसभेच्या एकूण जागा २४५ आहेत. यापैकी २३३ जागा अप्रत्यक्षपणे निवडल्या जातात आणि १२ सदस्य राष्ट्रपतींद्वारे नामनिर्देशित केले जातात. राज्यसभा निवडणूक जिंकण्यासाठी आवश्यक मतांची संख्या पूर्वनिश्चित असते. मतांची संख्या एकूण आमदारांची संख्या आणि राज्यसभेच्या जागांच्या संख्येच्या आधारावर मोजली जाते. एका आमदाराच्या मताचे मूल्य १०० आहे.

## डॉ. राजनीश कामत यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांची कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी डॉ. राजनीश कामत यांच्या नियुक्तीची घोषणा केली. डॉ. राजनीश कामत यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी किंवा ते वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करतील, यापैकी जी तारीख अगोदर असेल त्या तारखेपर्यंत असेल.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांचा कार्यकाळ दि. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी संपल्यामुळे हे पद रिक्त झाले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता.

डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विषयात एम.एससी. तसेच गोवा विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केली असून त्यांना अध्यापन, संशोधन व प्रशासनाचा व्यापक अनुभव आहे. डॉ. कामत यांच्या २११ संशोधन पत्रिका आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाल्या असून त्यांची १६ पुस्तके देखील प्रकाशित झाली आहेत. त्यांना अध्यापन, संशोधन तसेच प्रशासन क्षेत्रात व्यापक अनुभव आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या निवडीसाठी राज्यपालांनी कोईम्बतूर येथील भारतीय विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख (निवृत्त) डॉ. पी. कंदास्वामी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत केली होती.

महात्मा गांधी चित्रकूट ग्रामोदय विद्यापीठाचे (मध्य प्रदेश) माजी कुलगुरू प्रा. एन.सी. गौतम हे या समितीवर विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) प्रतिनिधी होते.

इंदोर येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सुहास जोशी आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी हे समितीचे अन्य सदस्य होते.

समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी डॉ. राजनीश कामत यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

### प्रभात किरणे

मायेची माया कधी नाही अटणार
वाळवंटात जणू दगडाला पाझर
थकले न कधी कर,कष्टच अपार
तिच्यामुळे आपण, तीच जगी ईश्वर

- इंजि. नागनाथ कलवले
लातूर मो. 97647 88288

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**कोरियन 'लर्निंग फॅक्टरी' कौशल्य विकासासाठी राज्य सरकारचे तीन ऐतिहासिक करार..**

### चिमटा दयाचा



श्वान पकडल्याचा देखावा
तर नसावा!!
पकडले असते तर एकाचा
जीव गेला नसता....!!

## बंगळुरुवरुन दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाचे इंजिन हवेतच पेटले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बंगळुरूवरून दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात गुरुवारी रात्री एक मोठी दुर्घटना टळली. लँडिंगच्या अवघ्या काही मिनिटे आधी विमानातील एका इंजिनला आग लागल्याचे वैमानिकांच्या लक्षात आले. यानंतर दिल्ली विमानतळावर तातडीने 'पूर्ण आणीबाणी' (र्त्रीश्रश्र एशीसशपलू) घोषित करण्यात आली. वैमानिकांनी कमालीचे प्रसंगावधान राखत विमानाचे दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षित लँडिंग केले. सुदैवाने, या विमानातील सर्व १८० प्रवासी आणि क्रू मेंबर्स पूर्णपणे सुरक्षित आहेत.

**लँडिंगपूर्वीच कॉकपिटमध्ये 'फायर वॉर्निंग'**

मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडियाचे 'AI 2802' (Airbus A321) हे विमान बंगळुरूवरून दिल्लीसाठी रवाना झाले होते. गुरुवारी (२१ मे) रात्री ९:३० च्या सुमारास विमान दिल्ली विमानतळावर उतरण्याच्या अंतिम टप्प्यात असताना, अचानक कॉकपिटमध्ये एका इंजिनमधून धूर निघत असल्याचे संकेत मिळाले. वैमानिकांनी तपासणी केली असता इंजिनला आग लागल्याची खात्री झाली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वैमानिकांनी तात्काळ एअर ट्रॅफिक कंट्रोलला याची माहिती दिली आणि विमानात आणीबाणीची घोषणा करण्यात आली.

**धावपट्टी काही काळासाठी बंद; प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले**

धोक्याचा इशारा मिळताच विमानतळावर अग्निशामक दल आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्यात आल्या. रात्री ९:३० वाजता विमानतळाच्या धावपट्टी क्रमांक '२९ठ' वर विमानाचे सुरक्षित लँडिंग करण्यात आले. लँडिंग झाल्यानंतर इंजिनमधील आग पूर्णपणे विझवण्यात यश आले.

या घटनेमुळे विमानतळावरील विमान वाहतूक काही काळासाठी थांबवण्यात आली होती. लँडिंगनंतर विमान सुरक्षितपणे धावपट्टीवरून बाजूला नेण्यात आले (ढुेशव) आणि सर्व प्रवाशांना सुखरूप खाली उतरवण्यात आले. यामुळे मोठा अनर्थ टळला असून प्रवाशांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.




## बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर लातूर पोलिसांची व्यापक तयारी

### कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना

**लातूर/प्रतिनिधी :** आगामी ईद-उल-अजहा (बकरी ईद) सण शांततापूर्ण, सलोख्याच्या वातावरणात व कायद्याच्या चौकटीत साजरा व्हावा यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विविध समाजघटक, धर्मगुरू व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत मुस्लिम समाजातील धर्मगुरू, हिंदूवादी संघटनांचे प्रतिनिधी, कुरेशी समाजाचे पदाधिकारी,तसेच गोरक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान पोलिसांकडून गोवंश हत्या बंदी कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत कायद्याचे उल्लंघन सहन केले जाणार नसल्याचे पोलीस प्रशासनाने ठामपणे स्पष्ट केले. कोणताही अनुचित प्रकार घडल्यास किंवा संशयास्पद हालचाल आढळल्यास नागरिकांनी तात्काळ स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.






लातूर जिल्हा पोलीस दलाकडून दिनांक २० मे ते ३० मे २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्हाभर विशेष बंदोबस्त व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. उपविभाग स्तरावर सात विशेष भरारी पथके तयार करण्यात आली असून त्यामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश करण्यात आला आहे. ही पथके जिल्ह्यात सतत गस्त घालून गोवंश हत्या बंदी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार आहेत.

तसेच राज्य सीमा, जिल्हा सीमा व जिल्ह्यातील संवेदनशील भागांमध्ये एकूण २२ ठिकाणी दिवसरात्र नाकाबंदी लावण्यात आली असून ३० मेपर्यंत ही विशेष तपासणी मोहीम सुरू राहणार आहे. या नाकाबंदी दरम्यान गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतूक, कत्तलीसाठी किंवा इतर कारणांसाठी होणारी हालचाल रोखण्यासाठी विशेष दक्षता घेतली जाणार आहे. मोटार परिवहन विभाग, पशुवैद्यकीय विभाग तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेही यामध्ये समन्वयाने सहकार्य घेतले जाणार आहे.

यावेळी लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, लातूर जिल्ह्याला सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि शांततेची समृद्ध परंपरा लाभली आहे. सर्व समाजघटकांनी संयमाने व परस्पर सहकार्याने वागून कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. सण उत्सव हे एकोपा व सामाजिक ऐक्याचे प्रतीक असून ते कायद्याच्या चौकटीत शांततेत पार पडणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. सदर बैठकीस कुरेशी समाजाचे पदाधिकारी, मुस्लिम समाजाचे धर्मगुरू, हिंदू संघटनांचे प्रतिनिधी, गोरक्षक संघटनांचे पदाधिकारी, लातूर जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभागाचे अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## शिक्षणात बदलाची गरज

शिक्षणात बदलाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रीय विचाराच्या शिक्षणाची मोठी गरज आहे. देश छोटा असला तरी चालले मात्र देशातील माणसे हे चिवट असले पाहिजेत. मुळात आपल्या देशातील नागरिक कष्ठाळू आहेत मात्र त्यांच्याअंगी राष्ट्रप्रेमाची भावना कमी आहे. यासाठी काय करावे तर शिक्षणात बदलाची गरज आहे. इतर समाज हा धार्मिक शिक्षण देतो. त्यामुळे कट्टर धार्मिकता निर्माण होते. वेळेच्यावेळी प्रार्थना करणे, एक दुसऱ्याला समावुन घेणे असा प्रयत्न केला जातो. चांगले गुण अनुकरणीय असतात, त्याचे अनुकरण केले पाहिजे. आज युद्ध चालू आहे ते दिर्घ काळ चालले असे वाटत नाही. या युद्धात इराण हा अमेरिका-ईस्त्राईला सडेतोड जबाब देत आहे. देशाची संपत्ती ही देशातील मजबुत, धाडसी नागरिक असतात हे कदापी विसरता येत नाही. देशातील नागरिक जर राष्ट्राभिमानी असतील तर त्याला डवचण्याची हिंमत कोणाला येत नाही. राष्ट्रीय विचार निर्माण करण्याचे एकमेव सामर्थ्य हे शिक्षणात आहे. भारतीय प्राचीन काळी वैदिक गुरुकुल पद्धती होती. त्यामुळे सर्व प्रकारचे ज्ञान मिळत होते. सर्वप्रकारची माहिती दिली जात होती. आत्मसंरक्षणाचे धडे दिले जात होते. एखादेवेळी संकट आले तर कशा प्रकारे ते परतावुन लावायाचे याचे ज्ञान दिले जात असते. शिक्षण हे घरापासून दूर नदीच्या काढी व झोपडीत असत. आता एसीमध्ये शिक्षण घेतले जाते. आलिशान इमारतीत ज्ञानार्जन होते. तरी समोरच्याबरोबर मुकाबला करण्यात घाबरले जाते. दोन हात करण्यात हातबल कशासाठी? याचा विचार केला पाहिजे. देशात सर्वात महत्वाचे म्हणजे मुलींना स्वसंरक्षणाचे धडे हे शिक्षणातून सक्तीने दिले पाहिजे. सध्याला वृत्तपत्रातून ज्या मुली किंवा महिलेवरील अत्त्याचाराच्या बातम्या वाचायला मिळातात त्यावेळी झाशीची राणीची आठवण होते. जिजाऊमातेची होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवीची आठवण होते. अनेक राण्या होवून गेल्या त्यांनी मोगलाशी दोन हात केला. ब्रिटीशा विरोधात लढल्या. देशाला स्वराज्य मिळाल्यानंतर महिला आबला का बनल्या! यामागील कारणे म्हणजे जे आलिकडे ज्ञान दिले जाते ते भारतीय नाही तर मेकालेची शिक्षण पद्धतीचा आवलंब करीत आहोत. ज्या शिक्षणामुळे शेकडो तरूण देशासाठी प्राण त्याग करण्याची हिंमत निर्माण झाली. स्वातंत्र्याच्या युद्धात सर्वार्पन केले. आज अशी तरूण पिढी निर्माण का होत नाही किंवा का निर्माण केली जात नाही असा प्रश्न निर्माण होतो. यामागील कारणे कोणती असतील तर शिक्षणात जे सामर्थ्य असावयास पाहिजे ते दिसून येत नाही. देशात सर्व काही निर्माण करता येते मात्र राष्ट्रीय प्रेम निर्माण करावे लागते. त्यासाठी प्रयत्न करावे लागते. आज राष्ट्रीय विचाराची शिक्षण पद्धती निर्माण करणारे माणसे नाहीत का? असा विचार समोर येतो. मुलीवर अत्त्याचारच्या घटनेत वाढ होत आहे. मानसिकता बदलली आहे. गर्भात असताना अभिमन्यू हा चक्रव्युह तोडण्याचे शिक्षण प्राप्त करू शकतो तर आजच्या युवकास तसे ज्ञान देण्यात माता कमी पडल्या का, असा प्रश्न निर्माण होतो. सर्वात महत्त्वाचे ज्ञान आहे ते मिळविले पाहिजे. आत्मसात केले पाहिजे. कोणतेही ज्ञान मिळविण्यासाठी कष्ठ घ्यावे लागतात. त्याच प्रमाणे भारताची शिक्षण पद्धती सर्वश्रेष्ठ होती. जगात आयुर्वेदाचे ज्ञान घेतले जाते. भारतीयांचे ज्ञानाला तोड नाही. ज्ञान देणारे हे ऋषीमुनी होते. निस्वार्थी विचाराने ज्ञानार्जन करीत होते. गुरू दक्षणा देण्याची वेळ आली तर राष्ट्रासाठी काय करणार असा विचार करून गुरूदक्षणाच्या बदल्यात राष्ट्रसेवेचे व्रत घेतले जात होते. जगात असे काही देश आहेत की, अमेरिकेला सुद्धा जुमानत नाहीत. इराण हा लहान देश असून तो अमेरिकेला मेटकुटीला आणल्याचे दिसून येत आहे. देश म्हणजे दगड-धोंडे किंवा आलिशान बंगले नाहीत तर देशातील कणखर जनता आहे. जे राष्ट्रावर संकट आल्यावर दोन हात करण्यात तयार असते. ते राष्ट्रच जीवंत समजले जाते. भारतात तसे बरे नागरिक आहेत. जम्मूकाश्मीरमधून पंडितांना हाकलताना कोणीही मदत केली नाही. परत पुन्हा बस्तान बसविण्याचा विचार देखिल करीत नाहीत. जर भारतावर संकट आल्यावर ते खरेच धावून येतील असे वाटत नाही, यामागील कारण म्हणजे अनेक जाती, मत व पंथाचे नागरिक राहातात. त्यांना आपली जाती, मत व पंथाचा विचार करतात. मर्यादित विचाराने प्रेरीत होवून वागले जाते हे योग्य नाही. पहिल्यांदा राष्ट्र हेच सर्वस्व मानले पाहिजे. भारताचा इतिहास पाहिला तर भारतीयांना धोक्याने फसविले हे उघड आहे. भारतीय हे कोणावरही विश्वास ठेवतात. त्यांना ज्ञान नसते कोण आपला आहे? त्यामुळे धोका होतो. राजा पृथ्वीराजला धोक्याचा शिकार व्हावे लागले. अनेक भारतीय राजाला धोक्याचा शिकार व्हावे लागले. पुन्हा धोका भारतीयाना बसू नये यासाठी खरा इतिहास शिकविला पाहिजे. अनेक बाबी चुकीच्या शिकविल्याचा परिणाम आज भोगावा लागत आहे. भारतीयांचा इतिहास गौरवशाली आहे. जो जाणून घेतला पाहिजे. सध्याला आपल्याला काय करायाचे या विचारात वाढ झाली. भारतातच भारतीयांना फसविणारे कोण आहेत. मुली का सुरक्षित नाहीत याचा विचार केला जात नाही. त्यामुळे पहिल्यावर्गापासून मुलभूत ज्ञान दिले पाहिजे. भारतीयांना सामार्थ्यवान बनविले पाहिजे. इराणी आज अमेरिकेला घाबरत नाहीत तर तोडीसतोड उत्तर देत आहेत. त्यामुळे कौतुकास प्राप्त आहेत. फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून विश्वनिर्माण करण्याचे सामर्थ्य नागरिकात असले पाहिजे. हे ज्ञान शिक्षणातून देवू शकते. शिक्षणातून आत्मसात करता येवू शकते हे लक्षात घेतले पाहिजे. शिक्षणावर जोर का द्यावा तर शिक्षणाच्या माध्यमातून क्रांतीकारी बनू शकतो. त्याला अन्याय, अत्त्याचार करणाऱ्याविषयी चिड निर्माण होवू शकते. जे काही क्रांतीकारक निर्माण झाले ते गुरूच्या शिक्षणामुळे, गुरुकुलीय ज्ञानामुळे! तेंव्हा शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे लक्षात येते, त्यामुळे शिक्षण राष्ट्रीय विचाराचे, राष्ट्रीय प्रेम वाढविणारे मिळाले तर अनेक समस्या सुटतील. चुकीच्या बाबीचा जर आवलंब करीत राहीलो तर चुकीचे घडणार आहे. भारतीय परंपरा व संस्कृतीचा विचार करून शिक्षणात बदलाची गरज आहे. शिक्षण राष्ट्रप्रेम वाढविणारे असावे हे सतत लक्षात घेतले पाहिजे.

# समाजसुधारणेचा दीपस्तंभ : राजा राममोहन रॉय

राजा राममोहन रॉय हे भारतीय पुनर्जागरणाचे अग्रदूत मानले जातात. आधुनिक भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक सुधारणांचा पाया घालणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाची जयंती म्हणजे समाजप्रबोधनाच्या कार्याची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस होय. एकोणिसाव्या शतकात त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये समाज सुधारणांसाठी केलेले प्रयत्न,त्यासाठी उभारलेला सनदशीर लढा आणि कायद्याची मदत घेऊन केलेल्या समाजसुधारणा आजही प्रेरणादायी आहेत.




त्यांनी अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकाच्या संक्रमणकाळात भारतीय समाजाला नव्या विचारांची दिशा दिली. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात आधुनिकतेची पहाट उगवली. राजा राममोहन रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर येथे झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय आणि आई तारिणी देवी हे धार्मिक वृत्तीचे होते. बालपणापासूनच त्यांना संस्कृत, फारसी, अरबी, बंगाली आणि इंग्रजी भाषांचे ज्ञान प्राप्त झाले. विविध धर्मग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. वेद, उपनिषदे, कुराण आणि बायबल यांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी मानवतेचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला. त्यांचा उत्कर्ष हा भारतातील सामाजिक आणि वैचारिक संक्रमणाच्या काळात झाला.

त्या काळात भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता होती. इंग्रजांचे राजकीय वर्चस्व वाढत असताना भारतीय समाज मात्र अनेक अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा आणि कालबाह्य चालीरीतींमध्ये अडकलेला होता. स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्रीशिक्षणावरील बंदी, विधवांचा होणारा छळ, जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींनी समाज पोखरला होता. धर्माच्या नावाखाली कर्मकांडांना अधिक महत्त्व आले होते. समाजात विवेकापेक्षा अंधश्रद्धेचे वर्चस्व वाढले होते.

अशा प्रतिकूल परिस्थितीत राजा राममोहन रॉय यांनी समाजसुधारणेचा ध्यास घेतला. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठवला. विशेषतः सतीप्रथेच्या विरोधातील त्यांचा लढा ऐतिहासिक मानला जातो. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला जिवंत जाळण्याची अमानवी प्रथा त्यांनी मानवतेविरुद्धचा अपराध असल्याचे ठामपणे मांडले. त्यांनी अनेक लेख, पुस्तके आणि निवेदने लिहून समाजमत जागृत केले. इंग्रजी सत्ताधाऱ्यांशी पत्रव्यवहार करून त्यांनी सतीप्रथा बंद करण्याची मागणी सातत्याने केली. त्या काळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेन्टींक यांच्याशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन १८२९ मध्ये सतीप्रथेवर बंदी घालणारा कायदा लागू करण्यात आला. हा भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला.

राजा राममोहन रॉय यांनी १८२८ मध्ये ब्राह्मो समाज या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून एकेश्वरवाद, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता आणि विवेकनिष्ठ विचार यांचा प्रचार करण्यात आला. त्यांनी मूर्तिपूजा, अंधश्रद्धा आणि अवास्तव कर्मकांडांना विरोध केला. धर्म म्हणजे मानवसेवा आणि नैतिकता हा संदेश त्यांनी दिला. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार केला. इंग्रजी शिक्षण, विज्ञान आणि गणित या विषयांच्या अभ्यासाला त्यांनी प्रोत्साहन दिले. भारतीय युवकांनी आधुनिक ज्ञान मिळवावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी हिंदू कॉलेज स्थापनेतही पुढाकार घेतला. बंगाली भाषेत अनेक ग्रंथ प्रकाशित करून त्यांनी समाजप्रबोधन केले.

संवाद कौमुदी आणि मिरात-उल-अखबारयांसारख्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर जनजागृती केली. भारतीय पत्रकारितेचे जनक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.समाजसुधारणेच्या कार्यात त्यांना मोठा विरोध सहन करावा लागला. सनातनी मंडळींनी त्यांच्यावर टीका केली. धर्मविरोधी, परंपराविरोधी अशी त्यांची बदनामी करण्यात आली. काहींनी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याचाही प्रयत्न केला. मात्र त्यांनी विवेक, तर्क आणि मानवतेच्या आधारावर आपले कार्य अखंड सुरू ठेवले. समाजहितासाठी संघर्ष करण्याची त्यांची वृत्ती अत्यंत प्रेरणादायी होती.

राजा राममोहन रॉय यांनी इंग्लंडमधील सत्ताधाऱ्यांशी आणि विचारवंतांशीही पत्रव्यवहार केला. भारतीय समाजातील परिस्थिती, शिक्षणाची गरज आणि सुधारणांचे महत्त्व त्यांनी ब्रिटिश प्रशासनाला पटवून दिले. भारतात आधुनिक शिक्षणपद्धती सुरू व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचाही पुरस्कार केला. प्रेसवरील निर्बंधांविरोधात त्यांनी आवाज उठवला.

सन १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी भारतीयांच्या प्रश्नांबाबत भूमिका मांडली. इंग्लंडमधील अनेक विद्वानांनी त्यांच्या विचारांचे स्वागत केले. २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टलजवळील स्टेपलटन येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारताने एक महान समाजसुधारक गमावला; मात्र त्यांनी पेटवलेला समाजप्रबोधनाचा दीप आजही तेवता आहे. राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचा प्रभाव भारतातील अनेक समाजसुधारकांवर पडला. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक केली.

महाराष्ट्र अशा सामाजिक सुधारणांच्या कायम पाठीशी राहिले आहे.राजा राममोहन रॉय यांच्या विविध चळवळीचे, उपक्रमाचे, समाजसुधारणांचे महाराष्ट्राला कायम आकर्षण राहिले असून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाने प्रेरणा मिळाली आहे. आज महाराष्ट्र शासनही महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक न्याय यासाठी विविध योजना राबवत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत महिलांच्या सुरक्षिततेसाठी, स्वावलंबनासाठी आणि आरोग्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन, महिला बचतगटांचे सक्षमीकरण, बालविवाह प्रतिबंध, महिला अत्याचार प्रतिबंध, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना शासनाने स्वीकारल्या आहेत. बेटी बचाओ, बेटी पढाओ, महिला स्वयंसहाय्यता गट, कौशल्य विकास कार्यक्रम, तसेच डिजिटल शिक्षण यांसारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.लाडकी बहीण योजनेच्या मार्फत महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचे व त्या माध्यमातून आर्थिक सुधारणांचे नवे दालन राज्य शासनाने उघडले आहे.

सामाजिक सुधारणा ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. राजा राममोहन रॉय यांनी दिलेला विवेक, समानता आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सामाजिक समतेचा, स्त्री-सन्मानाचा आणि प्रबोधनाचा विचार पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे. हेच त्यांना त्यांच्या जयंती दिनाला खरे अभिवादन ठरेल.

**-प्रवीण टाके,**
**उपसंचालक,**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

## 'भारत फोरकास्ट सिस्टम'चा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य -मंत्री गिरीश महाजन

### भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेसह महाराष्ट्राची आपत्ती व्यवस्थापन क्षमतेत मोठी झेप



**मुंबई/प्रतिनिधी :** अत्याधुनिक हवामान अंदाज प्रणाली 'भारत फोरकास्ट सिस्टम'चा वापर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले असून हवामान पूर्वसूचना, स्थानिक पातळीवरील तयारी आणि समन्वित प्रतिसाद यामध्ये मोठी सुधारणा होईल. यासाठी भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (IITM) समवेत करार महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन क्षमतेला अधिक बळकट करणारा महत्त्वाचा टप्पा आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (SDMA) भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (IITM), पुणे यांच्यासोबत सामंजस्य करार (MoU) केला असून, यामुळे राज्याच्या आपत्तीपूर्व तयारी आणि अतिवृष्टीसारख्या हवामानाशी संबंधित संकटांना प्रतिसाद देण्याच्या क्षमतेत मोठी वाढ होणार आहे.

या करारामुळे भारत सरकारच्या भारतीय हवामान विभागाच्या (IMD) 'मिशन मौसम' अंतर्गत विकसित करण्यात आलेली स्वदेशी 'भारत फोरकास्ट सिस्टम' (BharatFS) आता राज्याच्या निर्णयप्रक्रियेत थेट वापरली जाणार आहे. राज्य आपत्कालीन कार्य संचालन केंद्र (SEOC) आणि भू-स्थानिक निर्णय सहाय्य प्रणाली (GeoDSS) यांच्या माध्यमातून ही प्रणाली कार्यान्वित केली जाईल.

या उपक्रमामुळे महाराष्ट्र देशातील असे पहिले राज्य ठरले आहे, ज्याने डेटा आणि कार्यप्रवाहांचा वापर करून आपत्ती व्यवस्थापन व पूर्वसूचना प्रणाली अधिक सक्षम केली आहे. भारतऋड प्रणाली ६ किमी ÷ ६ किमी क्षेत्रासाठी अत्यंत सूक्ष्म आणि उच्च दर्जाचे हवामान अंदाज तयार करू शकते. त्यामुळे ग्रामपंचायत व उपतालुका स्तरापर्यंत अचूक हवामान माहिती उपलब्ध होणार आहे. याआधी उपलब्ध असलेल्या १२ किमी ÷ १२ किमी अंदाजांच्या तुलनेत ही मोठी प्रगती मानली जात आहे.

या प्रणालीमुळे उष्णतेची लाट, मुसळधार पाऊस, वादळ, पूर आणि भूस्खलन यांसारख्या आपत्तींबाबत अधिक वेगवान आणि प्रभावी पूर्वतयारी शक्य होणार आहे. हवामानासंबंधी माहिती दर तीन तासांनी अद्ययावत केली जाणार असून, पर्जन्यमान, कमाल-किमान तापमान, वातावरणीय दाब, वाऱ्याचा वेग व दिशा, तसेच ढगांचे प्रमाण याबाबत जवळपास प्रत्यक्ष वेळेत माहिती उपलब्ध होईल.

या उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी ३ तासांच्या अंतराने उच्च-रिझोल्यूशन हवामान अंदाज, प्रभावाधारित पूर्वसूचना (IBF), स्वयंचलित अलर्ट प्रणाली, तसेच सायरन, मोबाईल संदेश आणि सार्वजनिक प्रसारणाद्वारे एकाच वेळी सूचना प्रसारित करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेवटच्या टप्प्यातील नागरिकांपर्यंत वेळेवर इशारे पोहोचविणे अधिक प्रभावी होईल.

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनीता सिंगल यांनी सांगितले की, या सहकार्यामुळे राज्य व जिल्हास्तरावरील निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान आणि माहितीआधारित होईल. यामुळे पूर्वसूचना प्रणाली अधिक प्रभावी बनून नागरिकांपर्यंत शेवटच्या टप्प्यापर्यंत माहिती पोहोचविणे सुलभ होईल. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी सांगितले की, या सहकार्यामुळे वैज्ञानिक हवामान माहिती थेट जिल्हा प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांच्या हातात पोहोचणार असून, राज्यभरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही एक प्रभावी पायरी ठरेल. नागरिकांना हवामान पूर्वसूचना, आपत्ती तयारी आणि तातडीच्या सूचनांची माहिती एसडीएमए च्या अधिकृत माध्यमांतून नियमितपणे घेण्याचे आवाहन केले आहे. आपत्कालीन आपत्ती प्रतिसाद व मदतसाठी क्रमांक एसडीएमए १०७० , डीडीएमए १०७७ रुग्णवाहिका व वैद्यकीय आपत्कालीन सेवा १०८ आहेत.

# शेती कर्ज वाटपाचा विषय बँकांनी गांभीर्याने हाताळावा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेती, एमएसएमई आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी बँकांनी केवळ नफ्याचा विचार न करता सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून काम करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राष्ट्रीयकृत बँकांनी व्यापक दृष्टिकोन ठेऊन शेती कर्ज व पिक कर्ज वाटप गांभिर्याने घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.




सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बँकर्स समितीची १७१ वी बैठक झाली त्यावेळी बँकांना निर्दे शित केले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, राज्यस्तरीय बँकर्स समिति सदस्य उपस्थित होते.

एसएलबीसीच्या माध्यमातून वार्षिक कर्ज आराखडा २०२६-२७ चे विमोचन करताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील कर्जवाटप, पीक कर्ज, एमएसएमई क्षेत्र आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणींवर सविस्तर भाष्य केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यंदाच्या वार्षिक कर्ज आराखड्यात कृषी हंगाम, केंद्र शासनाच्या विविध योजना, एमएसएमई क्षेत्र आणि ग्रामीण विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, राज्यातील बहुतांश क्षेत्रांमध्ये कर्जवाढ होत असली तरी कर्ज खात्यांची संख्या सातत्याने कमी होत असल्याची बाब अत्यंत चिंताजनक आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, क्रेडिट वाढत आहे; मात्र खाते वाढत नाहीत, उलट कमी होत आहेत. ही परिस्थिती धोकादायक असून एसएलबीसीने यावर विशेष फोकस करुन स्ट्रॅटेजी तयार करण्याची गरज आहे. २०२२-२३ मध्ये राज्यात ६१.१५ लाख खाती होती. ही संख्या २०२३-२४ मध्ये ५६ लाखांवर आली, २०२४-२५ मध्ये ५४ लाखांवर पोहोचली आणि २०२५-२६ मध्ये ती केवळ ४३ लाखांवर आली आहे. ६१ लाखांवरून ४३ लाखांपर्यंतची घसरण ही अत्यंत गंभीर बाब आहे. नेमके काय चुकत आहे, याचा गांभिर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

### राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा सहकारी बँकाची पीक कर्ज वितरणात प्रभावी कामगिरी

पीक कर्ज वितरणात सहकारी बँकांची कामगिरी राष्ट्रीयीकृत बँकांच्या तुलनेत अधिक प्रभावी असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रीयीकृत बँकांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्यातील ६१ टक्के खाते कव्हर करतात आणि त्यांची कामगिरी ८५ टक्के आहे. याउलट राष्ट्रीयीकृत बँका २६ टक्के खाते कव्हर करूनही त्यांची कामगिरी केवळ ६७ टक्के आहे. याचा अर्थ असा आहे की राष्ट्रीयीकृत बँका पीक कर्ज आणि टर्म लोनच्या बाबतीत अपेक्षित गांभीर्य दाखवत नाहीत. हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. यावर्षी त्यांनी किमान ८० ते ८५ टक्के उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

### सिबिल स्कोअरच्या अटीमुळे शेतकऱ्यांना त्रास होऊ देऊ नये

पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरच्या कारणावरून अडवले जात असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

कर्ज हंगाम सुरू झाला की प्रत्येक जिल्ह्यातून सिबिल स्कोअरच्या तक्रारी येतात. आरबीआयने स्पष्ट केले आहे की पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट आवश्यक नाही. मात्र शाखा मुख्यालयाच्या सूचनांचे कारण देतात. त्यामुळे सर्व बँकांच्या मुख्यालयांनी स्पष्ट निर्देश द्यावेत की पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट लागू करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### जिल्हानिहाय कामगिरीवर चिंता

पीक कर्ज वितरणात केवळ सिंधुदुर्ग आणि धुळे या दोन जिल्ह्यांनी ९० ते १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्याचे मुख्यमंत्री यांनी नमूद केले. रायगड, पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि भंडारा हे जिल्हे ७३ ते ९० टक्क्यांच्या गटात असल्याचे त्यांनी सांगत पालघर, रत्नागिरी, सांगली, नंदुरबार आणि नांदेड या जिल्ह्यांतील कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी असल्याने या भागांमध्ये विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### एमएसएमई क्षेत्राबाबतही चिंता

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एमएसएमई क्षेत्रात कर्जवाढ होत असली तरी नवीन खाते वाढत नाहीत. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील 'तरुण' श्रेणीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, १५ लाख रुपयांपर्यंतच्या या श्रेणीत राज्यभरात आतापर्यंत केवळ साडेसात हजार लाभार्थी झाले आहेत. हीच श्रेणी अर्थव्यवस्थेला मोठे योगदान देऊ शकते. त्यामुळे सर्व बँकांनी यासाठी स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

### एसएलबीसी केवळ औपचारिकता राहू नये

एसएलबीसी ही केवळ वार्षिक बैठक किंवा छापील अहवालापुरती मर्यादित राहू नये, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एसएलबीसीचा आत्मा आणि उद्देश प्रत्यक्ष कामात उतरला तरच राज्याच्या आर्थिक विकासाला त्याचा खरा फायदा होईल. बैठकीत चांगली कामगिरी करणाऱ्या तसेच कमी कामगिरी करणाऱ्या बँकांची नावे जाहीर करण्याची गरज मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

# एआय, डिजिटल नवोपक्रम आणि सायबर सुरक्षेत देशात महाराष्ट्र आघाडीवर

## – माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव ब्रिजेश सिंह




**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात कृषीपासून नागरिक सेवा वितरणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे मोठे परिवर्तन होत असून राज्य शासन एआय, ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल नवोपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी काम करत आहे, असे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.

तंत्रज्ञान, नवोपक्रम, डिजिटल गव्हर्नन्स व सीएसआर विषयक उच्चस्तरीय 'टेक महाइम्पॅक्ट २०२६' परिषदेत बोलत होते.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाला तंत्रज्ञानाची सखोल जाण असून सार्वजनिक हित, रोजगारनिर्मिती आणि उद्योगांच्या वाढीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे. राज्य शासनाने ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स (जीसीसी) साठी स्पष्ट धोरण आखले असून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या अनेक व्यवसाय प्रक्रिया आता भारतात स्थलांतरित होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**'गोल्डन डेटाबेस' विकसित**

महाराष्ट्रातील माहिती तंत्रज्ञान विभागाला स्वतंत्र विभागाचा दर्जा देण्यात आला असून 'महा आयटी'साठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात आली आहे. नागरिकांना वारंवार तीच कागदपत्रे सादर करावी लागू नयेत यासाठी राज्याने 'गोल्डन डेटाबेस' विकसित केला आहे. या प्रणालीमुळे नागरिकांची माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध राहणार असून विविध योजनांसाठी पात्रता एपीआयच्या माध्यमातून आपोआप पडताळली जाणार आहे. त्यामुळे कागदोपत्री प्रक्रियेला मोठा वेग मिळणार आहे.

राज्यातील विविध विभागांत ई-ऑफिस प्रणाली लागू करून प्रशासकीय कामकाजाचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे. शासनाने १०० दिवसांचे आणि १५० दिवसांचे विशेष उपक्रम राबवून विभागीय कामकाजाला गती दिली आहे. जिल्हास्तरावर उपग्रह चित्रांच्या साहाय्याने अतिक्रमण शोधणे, जंगलतोडीवर नियंत्रण ठेवणे तसेच दुष्काळ किंवा अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे मूल्यांकन करून शेतकऱ्यांना मदत देण्याची प्रक्रिया अधिक स्वयंचलित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र स्वतःचे एआय विद्यापीठ स्थापन करण्याच्या दिशेने काम करत असून तंत्रज्ञान क्षेत्रातील मनुष्यबळ निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. राज्यातील सायबर सुरक्षेसाठी २०१५ मध्ये जवळपास एक हजार कोटी रुपयांच्या तरतुदीसह 'महाराष्ट्र सायबर' कार्यक्रम सुरू करण्यात आला. याअंतर्गत एफबीआय तसेच फ्रान्स आणि एस्टोनियाच्या धर्तीवर ४७ अत्याधुनिक सायबर प्रयोगशाळा उभारण्यात आले. आता 'महाराष्ट्र सायबर सिक्युरिटी कॉर्पोरेशन'च्या माध्यमातून ही क्षमता अन्य शासकीय विभाग आणि उद्योग क्षेत्रालाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**'ॲग्री एआय पॉलिसी' लागू**

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी सांगितले की, राज्याने 'ॲग्री एआय पॉलिसी' लागू केली असून तंत्रज्ञान वापरातील भाषा आणि साक्षरतेच्या अडथळ्यांवर मात करण्याचा प्रयत्न सुरू आहे. कोरकू, भिल, माडिया यांसारख्या स्थानिक बोलीभाषांमध्ये शेतकऱ्यांना साध्या मोबाईलवर आवाजाच्या माध्यमातून पिके, खत व्यवस्थापन आणि बाजारपेठेबाबत माहिती मिळू शकेल, अशी एआय आधारित व्यवस्था विकसित करण्यात येत आहे.

डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन (डीपीडीपी) कायद्याच्या अंमलबजावणीसाठीही राज्य शासन तयारी करत असल्याचे त्यांनी सांगितले. डेटा लोकलायझेशनच्या गरजा लक्षात घेऊन स्वदेशी डेटा सेंटर उभारणीवर भर दिला जात असून पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत या कायद्याची पूर्ण अंमलबजावणी अपेक्षित असल्याचेही ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.

## लाभार्थ्यांना कुठलाही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी: सभापती सुरज पाटील

**अहमदपूर/प्रतिनिधी :** घरकुल, विहीर लाभार्थ्यांना कुठलाही त्रास होणार नाही याची अधिकारी , कर्मचारी यांनी दक्षता घ्यावी अशा सूचना अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज बाबासाहेब पाटील यांनी घरकुल, विहित आढावा योजना बैठकीत दिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की दोन दिवसांपूर्वी अहमदपूर तालुक्यातील एका वयोवृद्ध नागरिकाचा घरकुला संदर्भातला चा व्हिडिओ समाज माध्यमात व विविध माध्यमातून आल्यानंतर सभापती सुरज पाटील यांनी तात्काळ घरकुल, विहीर विभागाच्या आढावा योजनेची बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये कुठल्याही लाभार्थीला पंचायत समिती पर्यंत बिलासाठी यावे लागू नये यासाठी आपण दक्ष राहून सर्वसामान्य नागरिकांची कामे करावे अशा सूचना दिल्या.

तसेच या बैठकीत सभापती सुरज पाटील यांनी गावनिहाय घरकुल, विहीर योजनाचा चा आढावा घेतला. मागील दोन वर्षातील पूर्ण, अपूर्ण व प्रगतीपथावर असलेल्या घरकुल, विहिरी कामे याचाही त्यांनी आढावा घेतला. प्रलंबित घरकुल, विहिरीची कामे हे ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण करावेत, तसेच लाभार्थींनिहा आढावा सादर करण्याच्या त्यांनी सूचना दिल्या. तसेच घरकुल, विहीर च्या संपूर्ण कामाच्या मस्टरची मागणी करून तात्काळ ते पूर्ण करून घ्यावे व लाभार्थ्यांना हप्ते वेळेवर टाकण्यात यावे अशा सूचना सुद्धा सभापती सुरज पाटील यांनी दिल्या.

येणाऱ्या काळात घरकुलाच्या, विहिरीच्या संदर्भात किंवा अन्य कशाच्याही तक्रार संदर्भात कुठल्याही कर्मचाऱ्याने निष्काळजीपणा करण्याचा प्रयत्न केला तर त्या कर्मचाऱ्याला थेट घरी पाठवण्याचा इशारा सुद्धा सभापती सुरज बाबासाहेब पाटील यांनी सर्व अधिकारी कर्मचारी यांना दिला.

या बैठकीस श्रीमती गीते मॅडम सामाजिक वनीकरण अधिकारी ,गटविकास अधिकारी पंकज शेळके घरकुल विभागाचे सर्व अभियंता रोजगार सेवक, तालुका डाटा ऑपरेटर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## लातूर शहर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी संघटनेची पुनर्बांधणी




**लातूर/प्रतिनिधी:** दिनांक १९ मे २०२६ रोजी लातूर शहर महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या संघटनेची बैठक क्षत्रिय कार्यालय येथे घेऊन संघटनेची पुनर्बांधणी करण्यात आली.

लातूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी व सफाई कर्मचारी अनेक दिवसापासून त्यांच्या मागण्यां प्रलंबित असल्यामुळे सर्व कर्मचारी त्यांच्या मागण्यांसाठी एकत्रित येत संघटना पुनर्बांधणी करण्यात आलेली आहे. यामध्ये संघटनेचे प्रमुख सल्लागार म्हणून रमाकांत पिडगे, कलीम शेख, खदीर शेख व कायदेशीर सल्लागार म्हणून समाधान सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे तसेच संघटनेचे अध्यक्ष म्हणून श्री रवी कांबळे यांची तर उपाध्यक्ष म्हणून बालाजी शिंदे सचिव धोंडीराम सोनवणे कोषाध्यक्ष अभिमन्यू पाटील व इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

संघटना पुनर्बांधणी मागील कर्मचाऱ्यांचा उद्देश हा आहे की मनपाच्या कर्मचाऱ्यांच्या सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम तात्काळ अदा करण्यात यावी तसेच मनपा कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा दहा तारखेपर्यंत करण्यात यावे अशा विविध मागण्यांसह कर्मचारी व अधिकारी एकत्र आले आहेत.

काय आहे प्रकरण? : या प्रकरणात मृत पावलेली व्यक्ती ही आपल्या पत्नी आणि मुलासोबत एक्सप्रेस मेलनं प्रवास करत होती. त्यावेळी एका स्थानकावर लघुशंकेसाठी तो फलाटाच्या विरुद्ध दिशेनं मेलमधून उतरला. मात्र अचानक ट्रेन सुरू झाली, तेव्हा धावती ट्रेन पकडताना पीडित व्यक्तीचा तोल गेला आणि तो खाली पडून ट्रेनखाली आला, ज्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात संपूर्णपणे त्या व्यक्तीचीच चूक असल्याचा ठपका ठेवत रेल्वे प्रशासनानं त्याला नुकसानभरपाई नाकारली. त्याविरोधात पीडिताच्या कुटुंबानं मुंबई उच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. धावती ट्रेन पकडताना जीव गेलाय हे महत्त्वाचं – हायकोर्ट : हे आत्महत्येचे प्रकरण नाही, पीडिताकडे प्रवासाचं वैध तिकीट होतं. त्यानं लघुशंकेसाठी मेलमधून उतरणं हे अपेक्षित नाही. मात्र ट्रेनमधून उतरण्याचं त्याचं कारण काहीही असलं तरी सुटलेली ट्रेन पकडतानाच हा अपघाता झालेला आहे. हा मुद्दा नुकसानभरपाई ठरवताना विचारात घ्यायला हवा होता, असं हायकोर्टानं आपल्या निकालात अधोरेखित केलंय. तसेच या पीडिताचा मृत्यू ट्रेनच्या धडकेत झालेला नाही. तर धावती ट्रेन पकडतानाच त्याचा जीव गेलाय. तसा पोलीस रिपोर्ट असून प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनीही तशी साक्ष कोर्टात दिलीय. यावर हा अपघातच होता यावर शिक्कामोर्तब करत हायकोर्टानं पीडित कुटुंबाला व्याजासकट नुकसानभारपाई देण्याचे आदेश जारी केलेत.

## राज्यपालांकडून अधिकारी, कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा



**मुंबइ/प्रतिनिधी:** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी दहशतवाद विरोधी दिनानिमित्त लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी यांना दहशतवाद विरोधी प्रतिज्ञा दिली.

अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्वशक्तीनिशी मुकाबला करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा स्मृतिदिन दहशतवाद विरोधी दिवस म्हणून पाळण्यात येतो.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांसह लोकभवनातील कर्मचारी व अधिकारी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यावेळी उपस्थित होते.

# एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष – किरण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजयलक्ष्मी माले यांना पीएचडी प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालय मधील मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष-किरण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजयलक्ष्मी प्रशांत माले यांना मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष-किरण शास्त्र या विषयात पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.



डॉ. विजयलक्ष्मी माले यांनी डॉ. डी. वाय. पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय येथील मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष-किरण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील एस. मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली इम्युनोहिस्टोकेमिस्ट्री पद्धतीद्वारे अँजिओजेनेसिससाठी मुखाच्या कर्करोगाचे निर्देशक या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. त्यांच्या संशोधनामध्ये ट्यूमर मार्कर्सच्या माध्यमातून मुखातील गाठींचे लवकर निदान कसे करता येऊ शकते, याचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनामुळे मुखाच्या कर्करोगाचे प्रारंभिक अवस्थेत निदान करणे अधिक सुलभ होणार असून, रुग्णांवरील उपचार वेळेत सुरू करण्यास मदत मिळणार आहे. परिणामी गाठींचे संपूर्ण उच्चाटन करणे शक्य होऊन रुग्णांच्या आरोग्य संरक्षणात मोठी मदत होणार असल्याचे डॉ. माले यांनी सांगितले. डॉ. माले यांनी यापूर्वीही राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये अनेक संशोधनपर शोधनिबंध प्रकाशित केले आहेत.

पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, डॉ. अभय कुलकर्णी, डॉ. प्रियंका लासुणे, डॉ. रोहिणी दिवेकर, डॉ. संयोज्यता बांगर यांच्यासह विविध विभागप्रमुख, प्राध्यापक व सहकाऱ्यांनी डॉ. विजयलक्ष्मी माले यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मिशन वेस्ट टू वेल्थ अभियान महापारेषणकडून राज्यभर राबविणार

## अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांचा पुढाकार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) आणि वेसॅक इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ६ जून २०२६ ते ६ जून २०२७ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रभर मिशन वेस्ट टू वेल्थ हा विशेष पर्यावरण जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे. अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली ऋवेस्ट टू वेल्थ कल्चर विकसित करून पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त परिसर, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती याबाबत व्यापक जनजागृती करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.




महापारेषणच्या सर्व परिमंडळ, मंडल, विभाग व उपविभाग स्तरावर वर्षभर विविध पर्यावरणपूरक उपक्रम, स्वच्छता मोहीम आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये सिंगल यूज प्लास्टिकमुक्त कार्यालय, जुन्या कपड्यांचा पुनर्वापर, ई-वेस्ट संकलन, जुने कागद व डायऱ्यांचे संकलन तसेच पर्यावरण संवर्धनासाठी सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे.



या उपक्रमांतर्गत संकलित करण्यात येणाऱ्या जुन्या डायऱ्या, कपडे व इतर उपयुक्त साहित्य गरजू विद्यार्थ्यांसाठी आणि सामाजिक संस्थांसाठी वापरण्यात येणार असल्याचे महापारेषणने स्पष्ट केले आहे. तसेच कार्यालय परिसर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी विशेष स्वच्छता व जनजागृती अभियानही राबविण्यात येणार आहे.

बांद्रा-कुर्ला संकुलातील 'प्रकाशगंगा' इमारतीत आयोजिलेल्या पर्यावरण संरक्षण विषयक सेमिनारमध्ये मांडण्यात आलेल्या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात येत असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनासाठी योगदान द्यावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) सुचिता भिकाने यांनी केले आहे.

# संगमेश्वर विद्यामंदिरचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश


**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या परीक्षेत येथील संगमेश्वर विद्यामंदिरच्या १८ विद्यार्थ्यांनी यात घवघवीत यश संपादन केले आहे.



श्रेयश किशोर गायकवाड हा २१४ गुण मिळवत विद्यालयात प्रथम, सोमेश्वर कल्याण राजे २१२ द्वितीय, धम्मदीप रवी मस्के हा २१० गुण मिळवत विद्यालयात तृतीय आला आहे. तसेच साईनाथ सुक्राचार्य पाटील याने २०८ गुण, शफिक मुक्तार शेख २००, कृष्णा संदिप गरड २००, यासेर नासेर शेख २००, स्वरा राहुल शिंदे २००, आकाश गणेश पारवे १९८, जान्हवी प्रशांत माडजे १९८, शरण्या नितीन वाघमारे १९६, वेदिका सदाशिव पांचाळ १९२, जाहेद अकबर शेख १९२, निता जनार्दन सूर्यवंशी १८४, ओमकार मनोहर शिंदे १७८, समृध्दी गिरीधर पांचाळ १७६, प्रज्ञा रामराव घोलप १७० तर गणेश संतोष धवन याने १६२ गुण मिळविले आहेत.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, सहसचिव आर. व्ही. जायेभाये, कोषाध्यक्ष कविता केंद्रे, संचालक प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, मुख्याध्यापक ए. व्ही. पवार, ए. व्ही. माने, जे. जी. कावळे, डी. एस. भदभदे, जी. बी. मोरे, एन. आर. मुंडे आदिंनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

### सीईटी गुणवत्तायादीबाबत सर्व प्रक्रिया पारदर्शक; शंका असल्यास विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा

**लातूर/प्रतिनिधी :** दि. १९ मे २०२६ रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. सचिन सावंत यांनी सीईटी २०२५-२०२६ च्या बीई/बीटेकच्या गुणवत्तायादी संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले होते. याबाबत सीईटी कक्षाने अधिकृत खुलासा करत सर्व प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडल्याचे स्पष्ट केले आहे. सीईटी कक्षाच्या वतीने सांगण्यात आले की, विद्यार्थ्यांनी, पालकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी कोणतीही शंका बाळगू नये. गुणवत्तायादी तयार करताना कोणताही गोंधळ किंवा गैरप्रकार झालेला नसून संपूर्ण प्रक्रिया नियमांनुसार पार पडली आहे. २०२५ च्या गुणवत्तायादीमध्ये कोणतीही चूक झालेली नाही, असा दावा देखील कक्षाने केला आहे. तसेच, काही विद्यार्थ्यांना पर्सेंटाईल व टक्केवारीतील फरकाबाबत शंका असल्यास त्यांनी थेट सीईटी कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्व प्रश्नांचे समाधान करण्यात येईल, अशी हमीही यावेळी देण्यात आली.

# आ.अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नांना मोठे यश

## औशात 'संत शिरोमणी श्री मारुती महाराज मार्गा' साठी तब्बल ७०० कोटींची मंजुरी

**औसा/प्रतिनिधी :** औसा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा देणारा आणि दळणवळण व्यवस्थेला अभूतपूर्व बळकटी देणारा महत्त्वाकांक्षी रस्ते प्रकल्प अखेर मंजूर झाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे एशियन इन्फ्रा इन्व्हेस्टमेंट बँक अंतर्गत बार्शी रोड जंक्शन, लातूर ते आलमला, औसा, नागरसोगा, पोमादेवी जवळगा, गुबाळ ते सास्तूर या राज्य मार्गाच्या रुंदीकरण व सुधारणा कामासाठी अंदाजे ७०० कोटी रुपयांची मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे औसा मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून नागरिकांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये दोन प्रमुख मार्गांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये बार्शी रोड जंक्शन, लातूर ते आलमला, औसा, नागरसोगा, पोमादेवी जवळगा, गुबाळ ते सास्तूर हा सुमारे ४० किलोमीटर लांबीचा राज्य मार्ग तसेच हसलगन ते संक्राळ, पोमादेवी जवळगा, चिंचोली तपसे, लामजना ते राष्ट्रीय महामार्ग ५४८(इ) हा २० किलोमीटर लांबीचा प्रमुख जिल्हा मार्ग यांचा समावेश आहे. या दोन्ही मार्गांचे आंतरराष्ट्रीय दर्जानुसार रुंदीकरण, मजबुतीकरण आणि आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार करण्यासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल अर्थात उझ्ठ तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

संत शिरोमणी श्री मारुती महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीतून हा मार्ग जात असल्याने या रस्त्याला 'संत शिरोमणी श्री मारुती महाराज मार्ग' असे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धार्मिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक वारसा जपणाऱ्या या नामकरणामुळे या



मार्गाला विशेष ओळख मिळणार आहे. स्थानिक नागरिक आणि भाविकांमध्येही या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

औसा मतदारसंघात यापूर्वीही मोठ्या प्रमाणावर रस्ते विकास प्रकल्प मंजूर करण्यात आले असून अनेक कामे वेगाने सुरू आहेत. आशियाई विकास बँक अर्थसहाय्य रस्ते विकास प्रकल्प टप्पा-३ अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या ४२८ कोटी रुपयांच्या 'निळकंठेश्वर मार्गा'चे काम सध्या सुमारे ६० टक्के पूर्ण झाले आहे. या मार्गामध्ये आशिव, मातोळा, हसलगन, नांदुर्गा, गुबाळ, मंगरूळ, गांजनखेडा, किल्लारी, सांगवी, जेवरी, सिंगनाळ ते नणंद या ५३ किलोमीटर रस्त्याचा समावेश आहे. तसेच २५८ कोटी रुपयांच्या 'महापुरुष मार्गा'चे कामही अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. महात्मा बसवेश्वर महाराज चौक, लातूर ते खोपेगाव, कव्हा, जमालपूर, खुंटेगाव, हासेगाववाडी, जयनगर, आपचुंदा, जावळी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, लामजना पाटी या ३२ किलोमीटर मार्गाचा या प्रकल्पात समावेश आहे.

नव्या रस्ते प्रकल्पामुळे औसा मतदारसंघातील ग्रामीण भाग शहरांशी अधिक वेगाने आणि सुरक्षितपणे जोडला जाणार आहे. शेतकऱ्यांना शेतमाल वाहतुकीसाठी सुलभ सुविधा उपलब्ध होणार असून व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास अधिक जलद आणि सुरक्षित होणार आहे. उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्रालाही या प्रकल्पाचा मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे. विशेषतः सास्तूर, आलमला, नागरसोगा आणि लामजना परिसरातील आर्थिक हालचालींना या रस्तेमार्गामुळे मोठी गती मिळणार आहे.

या ऐतिहासिक मंजुरीसाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री सुनित्राताई पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिहराजे भोसले यांचे औसा मतदारसंघातील जनतेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले आहेत.

औसा मतदारसंघात सलगपणे मंजूर होत असलेले कोट्यवधी रुपयांचे रस्ते प्रकल्प, वेगाने सुरू असलेली विकासकामे आणि वाढती दळणवळण सुविधा यामुळे येत्या काळात औसा मतदारसंघ मराठवाड्यातील महत्त्वाचे विकासकेंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

# कीर्तनाच्या सेवेतून यशाची गगनभरारी: दयानंद कला महाविद्यालयाच्या यशवंत कातळेचे दैदिप्यमान यश!

**लातूर/प्रतिनिधी :** जिद्द, अथांग मेहनत आणि योग्य शैक्षणिक जडणघडण लाभली की, ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थीही यशाची कशी गगनभरारी घेऊ शकतो, याचे ज्वलंत उदाहरण लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाने पुन्हा एकदा समाजासमोर ठेवले आहे. महाविद्यालयाचा बी.ए. द्वितीय वर्षात शिकणारा विद्यार्थी आणि प्रसिद्ध तरुण कीर्तनकार ह.भ.प. यशवंत कातळे याने आपल्या अमोघ वाणीने आणि कीर्तनसेवेच्या जोरावर संपूर्ण महाराष्ट्रात नाव उज्ज्वल केले आहे. कीर्तनसेवेच्या प्रवासासाठी गावोगावी फिरताना लागणारी गरज ओळखून त्याने स्वतःच्या कष्टाने आणि मेहनतीच्या जोरावर 'टाटा सिएरा'(ढ-ढ-डखएठठ-) ही आलिशान गाडी खरेदी केली असून, दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने या गाडीचे अत्यंत मनोभावे पूजन करून यशवंतचा विशेष गौरव करण्यात आला.

या कौतुक सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि श्री. प्रसाद कातळे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी यशवंतला भावी वाटचालीस शुभेच्छा देताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, ह.भ.प. यशवंत कातळे हा इयत्ता तिसरीपासूनच कीर्तनाची सेवा बजावत आहे. परंतु, त्याने जेव्हा दयानंद कला महाविद्यालयाच्या इयत्ता अकरावीच्या वर्गामध्ये प्रवेश घेतला, तेथून खऱ्या अर्थाने त्याच्या ज्ञानामध्ये प्रगल्भता आली. येथील समृद्ध आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरणामुळे त्याच्या ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावत गेल्या. तो सध्या बी.ए. च्या दुसऱ्या वर्षामध्ये शिक्षण घेत असून भविष्यात तो ज्ञानाची अजून अनेक क्षितिजे पादाक्रांत करेल यामध्ये कोणतीही शंका नाही. आज तो जरी स्वतःच्या कष्टाने घेतलेल्या टाटा सिएरा कारमधून प्रवास करत असला, तरी भविष्यात तो आपल्या कीर्तनसेवेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन विमानाने प्रवास



करेल यात यत्किंचितही शंका नाही, असा विश्वास प्राचार्यांनी व्यक्त केला. उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी यशवंतचे भरभरून कौतुक करत त्याला शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, यशवंत जेव्हा अकरावीमध्ये आमच्याकडे प्रवेशासाठी आला, त्यावेळेस त्याला केवळ चार भिंतीतील शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता, महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या अथांग पुस्तकांच्या आणि ग्रंथालयाच्या माध्यमातून त्याचा सामाजिक दृष्टिकोन कसा वृद्धिंगत होईल, यासाठी पूर्णपणे वैचारिक स्वातंत्र्य दिले गेले. याचाच परिपाक म्हणजे आज तो उत्तम कीर्तनकार बनून समाजाला प्रबोधनाची सुंदर सेवा देत आहे.

आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयाला देत यशवंत कातळे याने दयानंद शिक्षण संस्था व दयानंद कला महाविद्यालयाविषयी अत्यंत कृतज्ञतापूर्वक गौरोद्गार काढले. तो म्हणाला की, संपूर्ण महाराष्ट्रात नामांकित असलेल्या दयानंद शिक्षण संस्थेत आणि त्यांतर्गत येणाऱ्या दयानंद कला महाविद्यालयात प्रवेश घेणे हे माझे एक मोठे स्वप्न होते. या महाविद्यालयात चालू असलेले शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या केवळ ज्ञानाच्या कक्षाच रुंदावत नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच त्यांच्या आध्यात्मिक विकासावरही तितकाच भर देते. दयानंद कला महाविद्यालय हे सर्वगुणसंपन्न असून विद्यार्थ्यांची शैक्षणिक, सामाजिक व मानसिक जडणघडण या ठिकाणी अत्यंत चोखपणे केली जाते. रेणापूर तालुक्यातील एका छोट्याशा गावातून येऊन मी जेव्हा दयानंदमध्ये प्रवेश घेतला, तेव्हा याच महाविद्यालयाने माझ्यामध्ये व्यासपीठ गाजवण्याचा आणि समाजासमोर उभे राहण्याचा सभाधीटपणा आणला. आज मी वाडी-वस्तीपासून ते भारतातल्या विविध राज्यांपर्यंत सामाजिक संदेश, समाजप्रबोधन व शिक्षणाविषयीची जनजागृती माझ्या कीर्तनातून करत आहे, ती केवळ दयानंदच्या संस्कारांमुळेच. पुढे बोलताना यशवंतने महाराष्ट्रातील तमाम विद्यार्थी मित्रांना आवाहन केले की, ज्या च्या विद्यार्थ्यांना आपले भविष्य उज्ज्वल व उत्तुंग घडवायचे आहे, अशा प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी 'दयानंद कला महाविद्यालयाचीच' निवड करणे गरजेचे आहे. आपल्या ग्रुपवरील प्रत्येक मित्राने आपल्या यशस्वी भविष्यासाठी दयानंद कला महाविद्यालयातच प्रवेश घ्यावा आणि आपल्या करियरला एक नियोजितबद्ध व सुंदर आकार प्राप्त करून घ्यावा. या गाडी पूजन सोहळ्याप्रसंगी डॉ. अंकुशकुमार चव्हाण, सेवानिवृत्त क.म. वि. शिक्षक श्री. बी.ए. उटीकर, प्रा. दशरथ ननावरे, डॉ. सुधीर गाडवे, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. राजू मोरे, प्रा. मनोज गवरे, प्रा. महेश जंगापल्ले आदी प्राध्यापक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या संपूर्ण लातूर जिल्ह्यात दयानंद कला महाविद्यालयाचे आणि विद्यार्थी यशवंत कातळेचे कौतुक होत असून, इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये दयानंद कला महाविद्यालयाविषयी प्रचंड ओढ निर्माण झाली आहे.

### लातूर काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी पुन्हा अभय साळुंके; तर शहराध्यक्षपदी प्रा. शिवाजी जवळगेकर यांची निवड!





**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने देशभरात 'संघटन सृजन अभियान' राबविण्यात आले होते. या अभियानांतर्गत देशभरातील विविध सेलच्या अध्यक्षपदांची निवड करण्यात आली आहे. यात लातूर काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी पुन्हा एकदा अभय साळुंके यांना काँग्रेस पक्षाने संधी दिली आहे, तर ६ वर्षांचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण केलेल्या ड. किरण जाधव यांच्या जागी आता शहर जिल्हाध्यक्षपदी प्रा. शिवाजी जवळगेकर यांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय निरीक्षकांच्या उपस्थितीत जनभावनांचा कौल या संघटन सृजन अभियानांतर्गत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे निरीक्षक तथा चंदिगडचे प्रदेशाध्यक्ष एच. एस. लकी यांनी लातूरचा दौरा केला होता. त्यांनी आठवडाभर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये जाऊन जिल्हाध्यक्ष निवडीसंदर्भात स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. या दौऱ्यादरम्यान संपूर्ण जिल्हाभरातून अभय साळुंके यांना प्रचंड पाठिंबा दिसून आला. पक्ष संघटनेला अधिक मजबूत करण्यासाठी त्यांच्यासारखा आक्रमक चेहराच जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदासाठी योग्य आहे, अशी भावना कार्यकर्त्यांनी निरीक्षकांसमोर व्यक्त केली. अभय साळुंके यांना वर्षभरापूर्वीच जिल्हाध्यक्ष पदाची संधी मिळाली होती. राज्याचे माजी मंत्री आ. अमित विलासरावजी देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे तसेच लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जिल्हा परिषद निवडणुका अत्यंत ताकतीने लढवल्या आणि पक्षाला अपेक्षित यशही मिळवून दिले. यापूर्वीच्या विधानसभा निवडणुकीत अभय साळुंके यांनी निलंगा मतदारसंघात अतिशय निकराची लढाई लढत जवळपास १ लाख मते घेतली होती. त्यांच्या या आक्रमक लढाईमुळे भाजपचे संभाजी पाटील निलंगेकर यांचे धाबे दणाणले होते. त्यांच्या याच लढाऊ वृत्तीची आणि कामगिरीची दखल घेत केंद्रीय नेतृत्वाच्या सर्व कसोट्यांवर ते पुन्हा एकदा पात्र ठरले आहेत. राज्याचे माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांची भक्कम साथ अभय साळुंके यांच्या पाठीशी असून, ते आगामी काळात अधिक आक्रमकपणे कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहून जिल्हाभर संघटन वाढवतील, असा विश्वास पदाधिकारी,कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. दुसरीकडे, शहर जिल्हाध्यक्ष म्हणून ड. किरण जाधव यांनी तब्बल ६ वर्षे यशस्वीपणे काम पूर्ण केले. त्यांच्या कार्यकाळात लोकसभा, विधानसभा व महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या आणि त्यात त्यांची कामगिरी उत्तम राहिली. परंतु, पक्षातील सर्वांनाच कामाची संधी देण्याच्या भूमिकेतून या पदावर बदल करण्यात आला असून, नवनियुक्त शहराध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर यांची निवड करण्यात आली आहे. या दोन्ही नवनियुक्त अध्यक्षांच्या निवडीनंतर सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री आ. अमित देशमुख आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख यांनी अभय साळुंके व प्रा. शिवाजी जवळगेकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना याच ताकतीने काम करून जिल्ह्यात काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

लातूर समाचार
वाचा ऑनलाईन
www.
latursamachar
.com
वर..

### पाठीशी ..

आपत्तीत संकटांत
उभे राहून पाठीशी
चुका गुन्हे पापसारे
सहजघाले पाठीशी

सोडवेघोटाळ्यांतून
अनुभव ते गाठीशी
अंगावरी रे चौकशी
दुश्मनीघेई काठीशी

मीचं करे तुरूंगवारी
मित्रत्वजडे लाठीशी
मल्लम्हणून भिडलो
मरणवेदना मिठीशी

वेदना तळमळे जसे
घट्टधरले मी पोटाशी
सुधा वर्षाव तुम्हांवर
विषद्रव्ये घे ओठांशी

पुरावे माझ्या नावाने
ठसेजुळतात बोटाशी
गोळा करता खंडणी
इमानराखले नोटांशी

बाहेर मीचं पहारेकरी
चर्चा आतल्यागटाशी
बिंग फोडले फितुरांचे
सामीलहोवून कटाशी

आता तिष्ठतो दाराशी
तळमळे एका भेटीशी
परकाकेला क्षणार्धांत
धरली अफवा वेठीशी

– **हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# निलंगा तालुक्यात औषध व्यावसायिकांचा कडकडीत बंद

**निलंगा/प्रतिनिधी :** प्रतिनिधी ऑनलाईन औषधी विक्रीच्या विरोधात ऑल इंडिया केमिस्ट संघटनेने एक दिवसीय संप पुकारला होता. यात निलंगा तालुक्यातील सर्वच औषधी व्यवसायीकानी आपली दुकाने कडकडीत बंद ठेवून केंद्र सरकारकडे आपल्या मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले. देशात ऑनलाईन फार्मसीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात औषध विक्री केली जात आहे. यात नकली औषध विकली जात आहेत. शिवाय कॉर्पोरेट कंपन्या ऑनलाईन व्यवसाय क्षेत्रात उतरल्याने भारतीय औषधी व्यवसाय अडचणीत आला आहे. ऑनलाईन औषध विक्रीने सामान्य नागरिकांच्या जीवनाशी खेळण्याचा प्रकार आहे. औषधी फार्मासीस्टच्या देखरेखीखाली विकली जावीत असा कायदा आहे पण ऑनलाईन विक्रीतून कायदा मोडला जात आहे. या अशा जिवघेण्या ऑनलाईन विक्रीस बंदी घालावी. कोरोना काळात केलेली औषधाबाबतचे कायदे रद्द करावे यासह अन्य मागणी यासाठी दि २० मे २०२६ रोजी केमिस्ट संघटनेने भारत बंद पुकारला होता. या बंदमध्ये निलंगा शहर व तालुक्यातील तब्बल २५० केमिस्ट बांधवांनी आपली व्यावसायिक दुकाने पूर्णपणे बंद ठेवून संपात सहभाग नोंदवत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्रित येत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून मानवंदना देण्यात आली.



केंद्र शासनाच्या धोरणाच्या विरोधात घोषणाबाजी करून उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष ओम बाहेती, तालुकाध्यक्ष बालाजी थेटे, उपाध्यक्ष सोमनाथ आगरे, उपाध्यक्ष वैभव पाटील, सचिव राजेंद्र धुत, बाबुराव महाजन, हंसराज शिंदे, विकास साळुंके, मनोज पाटील, दत्ता पाटील, किशन बाहेती, भाग्यश्री मांजरीकर, सुप्रिया नाईकवाडे, कालिदास पाटील, प्रमोद जाधव, भगवान लड्डा, भगवान बोलसुर, विशाल नेलवाडे, सचिन जगताप, अजय पेठकर, हर्षवर्धन सातपुते, अभिषेक गडीकर, अजिम बागवान, खादीम जिय्या असिम पांढरे, नागेश चव्हाण, जेठ्ठी अनिल शेखर पौळ, प्रवीण वाघमारे, सतिश चाकोते, अमर तांदळे, प्रसाद चव्हाण, शुभम कांबळे, राजेश घायाळ आदी उपस्थित होते.

## १ लाख २ हजार ९२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त

### विशेष पथकाची गांधी मार्केट परिसरात कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीविरोधात पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक शेख आयुब यांना गांधी चौक पोलीस स्टेशनच्या अमलदारासह संयुक्तरीत्या धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित माल जप्त केला आहे.

दिनांक १९ मे २०२६ रोजी सकाळी गांधी चौक पोलीस स्टेशन हद्दीतील गांधी मार्केट परिसरात मध्यमवर्ती बसस्थानकाच्या मागील बाजूस पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाला माहिती मिळाली की, गांधी मार्केट येथील पारस कन्फेशनरी या दुकानात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री सुरू असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे विशेष पथकाने तात्काळ संबंधित दुकानावर छापा टाकला. कारवाईदरम्यान दुकानात उपस्थित असलेल्या इसमास ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता त्याने आपले नाव गौसोदिदन वय २३ वर्षे, रा. मळवटी रोड, सकपाळ नगर, लातूर. असे सांगितले.दुकानातील पोत्यांची व साहित्याची झडती घेतली असता महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले विविध प्रकारचे गुटखा, पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. त्यामध्ये विविध प्रकारच्या प्रतिबंधित मालाचा समावेश असून एकूण १,०२,९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी गौसोदिदन याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २७४, २७५, २२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये गांधी चौक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक, श्री अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख, पोलीस अमलदार युसुफ शेख, रामहरी भोसले, यशवंत घुगे पोलीस ठाणे गांधी चौक चे पोलीस अंमलदार शाहु बनसोडे यांच्या विशेष पथकाने संयुक्तरीत्या यशस्वीरीत्या पार पाडली.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६